# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे

फोन.नं. ०२२-२९४५१००१

Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र १३२ दिनांक- २१/०५/२०२१

## रात्रीच्या वेळी पादचारी इसमास ठोकर मारुन त्याचे मृत्यूस कारणीभूत ठरून पळून गेलेल्या दुचारीस्वारास अटक.नवघर पोलीसांची कामगिरी.

नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I ३७६/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ३०४(अ),२७९,३३७, ३३८ सह मोटार वाहन कायदा कलम १८४,१८७ प्रमाणे दि. १५.०५.२०२१ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. दि. १४.०५.२०२१ रोजी २२.०० वा. चे सुमारास नमुद गुन्हयातील फिर्यादी श्रीमती स्नेहन रविंद्र शितप, वय ४३ वर्षे, यांचे पती रविंद्र विश्राम शितप,वय ५० वर्षे, हे इंद्रलोक ते गोल्डन नेस्ट सर्कल लेनलगत ॲक्वा लॉज जवळील आयसीआयसीआय बँकेचे एटीएममधुन पैसे काढुन रस्ता ओलांडत असतांना एका अनोळखी मोटार सायकल स्वाराने भरधाव वेगात धडक दिल्याने त्यांचा जागीच मृत्यु झाला होता.

सदर गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने तो लवकरात लवकर उघडकीस आणण्याकरीता नवघर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी सांगितलेल्या वर्णनाचे आधारे तांत्रिक तपास करुन तसेच अपघाताचे वेळेशी साधर्म्य साधुन नमुदचा गुन्हा हा रॉयल इन्फील्ड कंपनीची थंडरबर्ड मोटार सायकल क्र. एमएच-०४-जेएल-०५८१ वरील चालक नामे राहुल दत्तात्रय रसाळ, रा. भाईंदर पश्चिम यांनी केलेला असल्याचे तपासात निष्पन्न करुन त्यास अटक करण्यात आलेली आहे. नमुद गुन्हा दाखल होताच आपघात करणा-या अनोळखी आरोपीताची कोणती ठोस माहिती नसतांना गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन गुन्हयाचा तत्काळ तांत्रिक तपासाचे आधाराने पडताळणी सदर गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

सदरची कामगिरी श्री अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, डॉ.शशीकांत भोसले, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग,यांचे मार्गदर्शनाखाली मिलिंद देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे ,सपोनि/योगेश काळे, पोउनि/संदिप ओहोळ, पोना/१४१८ रविंद्र भालेराव, पोशि/२८३८ युनुस गिरगांवकर, पोशि/३४५८ संदिप जाधव यांनी केली आहे.

Scanned with CamScanner